# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  ३०/०५/२०२३

दुखापतः-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोस्टे गाडगेनगर अमरावती<br><br>अप.क्र. ७३२/२३ कलम ३२६,२९४, ५०६ब,३४ भा.द.वि. | अमरावती | दि. १५.०५.२३ चे २३.३० वा दरम्यान<br><br>दि. २९.०५.२०२३ चे २०.१८ वा | धर्मपाल बाबाराव खडसे वय ३४ वर्ष रा रमाबाई आंबेडकर नगर अमरावती | १. सुमेत गौतम वानखडे वय २५ वर्ष २. एक महिला<br><br>रा रमाबाई नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा जेवन करुन घराबाहेर उभा असतांना आरोपी क्र १ आला व म्हणाला की तु शिवीगाळ का करतो. फि ने त्याला मह्टले की मी तुला शिवागीळ केले नाही मी माझ्या घरासमोर चुपचाप बसलो आहे असे म्हटले असता आरोपी क्र १ ने त्याच्या हातातील बासाची काडी ने फि. ला मारहाण करुन जखमी केले  व आ क्र २ ने अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन फि चे डोक्याचे केस पकडुन तोंडावर थापडाने मारहाण करुन मारण्याची धमकी दिली. फिर्यादी इरविन येथे उपचारकरिता भरती केले असता फिर्यादीचे कमरेचे हाड फॅक्चर झालेले आहे. अशा फिर्यादीचे चे बयाण वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ५०५/२३ कलम ३८० भादंवि | बालाजी प्लॉट, विनायक सभागृहाजवळ, अमरवती | दि २४/०५/२०२३ चे २३/०० वा ते दि २५.०५.२०२३ चे ०९.३० वा. दरम्यान<br><br>दि, २९/०५/२०२३ च २३.०२ वा. | क्रिष्णा सुनिल मुंधडा, वय 27 वर्ष, रा बालाजी प्लॉट, विनायक सभागृहाजवळ, अमरावती | अज्ञात ` | हकीकत अश्या प्रकारे आहे कि यातील फिर्यादी यांनी पो. स्टे. ला लेखी रिपोर्ट दिला की, दि.२४.०५.२०२३ रोजी रात्री ११.०० वा पावेतो मी माझ्या लॅपटॉपवर काम करुन लॅपटॉप बंद करुन माझ्या बॅगमध्ये ठेवला दुसरे दिवशी दि २५.०५.२०२३ रोजी सकाळी ०९.३० वा चे दरम्यान माझ्या बॅगमधील लॅपटॉप काढण्याकरीता गेले असता मला माझा लॅपटॉप दिसला नाही त्यामुळे घरात आजुबाजुला शोध घेतला परंतु दिसुन आला नाही माझा एच पी प्रो बुक कंपनीचा लॅपटॉप कि अं १,००,०००/- रु.चा कोणीतरी अज्ञात चोराने घराच्या आत प्रवेश करुन उघडया घरातुन चोरुन नेला आहे. माझ्याकडे लॅपटॉप कागदपत्र उपलब्ध नसल्याने कागदपत्र कंपनीकडुन प्राप्त करुन आज दि २९.०५.२०२३ रोजी पोलीस स्टेशन माझा लॅपटॉप चोरी करणारे चोराविरुध्द तक्रार देत आहे. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ **अपघात :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अप क्र ३८०/२०२३ कलम २७९ भादवि | संजय गांधी नगर चौक अमरावती | दि.२९/०५/२०२३ चे १२.३० वा ते १२.४५ वा<br><br>दि.२९/०५/२०२३ चे १६.३३ वा. | रामराव भाऊराव बनसोड वय ६८ वर्ष, व्यवसाय- सेवानिवृत्त रा मेघदुत कॉलनी अमर कॉलनी जवळ अमरावती | अज्ञात वाहन चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे त्यांची स्प्लेंडर गाडी क्र MH२७W५२७७ ने संजय गांधी नगर येथील महेन्द्र खंडारे इलेक्ट्रेशन याला घेण्याकरीता जात असताना यशोदा नगर ते संजय गांधी चौकातुन संजय गांधी नगर नं २ कडे जाताना अज्ञात मोटार सायकल वाहन चालक कुंभारवाडा ते यशोदा नगर कडे जात असताना फिर्यादीच्या गाडीला आपल्या ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या गाडीच्या समोरच्या भागाला जबर ठोस मारली सदर अज्ञात गाडी चालक याने ग्रीन रंगाचे लाईनिंगचे फुल बाहयांचे शर्ट , निळा जिन्स घातलेला वय अंदाजे २५ ते ३० वर्ष असुन आपलीगाडी थांबवुन फि चा पडलेला पोको सी३ कंपनीचा मोबाईल उचलुन म्हणाला की, माझ्या गाडीचे नुकसान भरपाई दिल्यावर तुमचा मोबाईल परत देणार असे म्हणुन निघुन गेला. सदर अज्ञात मो सा चालक याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवुन फि चे नुकसान केले व मोबाईल घेवुन गेला अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | , पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अप क्र ३८१/२०२३ कलम २७९, ३३७ भादवि सहकलम १८४ मो. वाहन कायदा | महादेवखोरी अमरावती | दि. २४/०५/२०२३ चे १३.३० वा.<br><br>दि. २९/०५/२०२३ चे १७.१० वा. | अतुल ज्ञानेश्वरराव पळसकर वय ३६ वर्ष व्यवसाय कारपेंटर, जात सुतार, रा. गजानन नगर, महादेवखोरी जवळ अमरावती | अजय गोयटे ऑटो क्र MH २७ BW ४५९४ | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद ऑटोचालक याने त्याचे ताब्यातील वाहन हे महादेवखोरी येथील पुलावरुन कच्च्या रस्त्याने चुकीच्या मार्गाने एक्सप्रेस हायवेवर आत चढवले. फिर्यादी यांचे आईने व फिर्यादी यांनी त्यास टोकले असता त्यावर त्यानी काही होत नाही असे म्हटले व ऑटो पुढे घेवुन गेला. त्याचदरम्याण समोरुन एक स्प्लेंडर गाडी क्र MH२७BY९६६४ वर चालक व पाठीमागे एक इसम सिलेंडर पकडुन असे आले असता ऑटोचालकाने त्याचे ताब्यातील ऑटो भरधाव व हलगर्जीपणाने चालवुन त्या गाडीचालकाला समोरुन जबर ठोस मारली त्यामुळे ते दोन्ही इसम खाली पडल्याने त्यांना दुखापत झाली तसेच फिर्यादीच्या आईचे हाताला सिलेंडर चा जोराचा मार लागला त्यामुळे फिर्यादी त्यांच्या आईला उपचाराकरीता हॉस्पिटलला घेवुन गेले. यातील नमुद ऑटोचालकाने आपल्या ताब्यातील ऑटो भरधाव व हलगर्जीपणाने चालवुन फि चे आईला व दोन इसमास जखमी केले व नुकसान केले असा आज रोजी पो स्टे ला येवुन जबानी रिपोर्ट दिल्याने सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पोस्टे गाडगे्नगर अमरावती अप.क्र. ७३१/२३ कलम २७९ ,३३८ भा.द.वि. सहकलम १३४,१७७ मो वा का | कल्पतरु कन्स्टक्शन इमारत समोरील रोड अम. | दि. २९.०५.२३ चे ०७.३० वा दरम्यान<br><br>दि. २९.०५.२०२३ चे १९.२८ वा | विनायक संपतराव मोहीते वय 59 वर्ष रा साई अपार्टमेंट नवसारी अमरावती | एमएच २७ ए आर ०३१२ कार चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना.ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा त्याचे ज्युपीटर मोपेट क्र एम एच २७ सी एल ८४८९ ने जात असता मागुन भरधाव वेगाने एक कार क्र एमएच २७ ए आर ०३१२ चे चालकाने धरधाव वेगाने आणुन ओव्हरटेक करण्याच्या नादात फिर्यादीचे गाडीला धडक दिली त्यामुळे फिर्यादी व त्याची पत्नी गाडीसह खाली पडल्याने जखमी झाले फि चे पत्नी ला पाठीला व कमरेला मार लागुन पाठीचे हाड फॅंक्चर झाले आहे व गाडीचे स्टिल गार्ड तुटुन नुकसान झाले आहे.अशा फि.चे जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

- ईतर :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | पोस्टे गाडगेनगर अपक्र. ७३३/२३ कलम- २९४,५०६ (ब)४४८, १८६ भादवी सहकलम- ४,२५ आर्म अॅंक्ट | भुजल यात्रीकी उपविभाग जिल्हा परीषद अमरावती | घतावेळ दि.२९.५.२०२३ चे ०९.०० वा<br>दातावेळ दि.२९.५.२०२३ चे २१.०२ वा | उत्तमराव शामरावजी डोदरे वय- ५५ रा. गजानन महादेव खोरी मागे अमरावती | भुषन शालीकराम राठोड वय-३०रा आदीवासी कॉंलनी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकानी याती ल फिर्यादि हे नमुद घटना स्थळी माजी सैनीक परीचर म्हणुन नोकरीस आहे नमुद वेळेस सकाळी फिर्यादी हे साफ सफाईचे काम करुन उभे असताना त्याच्या कडे असलेले ३० वर्षापुर्वीचे किरायदार त्याचा मुलगा हा आँफिस मध्ये आला व काही कारण नसताना त्याने फिर्यादीस शिवीगाळ केली त्याला शिवीगाळ करणायाचे कारण विचारले असता आरोपीने कमरेला हात लावुन मोठ चाकु काढला व म्हणाला की, तु बाहर निकल तुझे खत्म करता हु अशी धमकी दिली त्यामुळे कार्यालया मधील लोक जमा झाल्याने आरोपी तेथुन पळुन गेला अशा फि.चे जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | खोलापुरी गेट अप.क्र. १००/२०२३ कलम १४२ म. पो. का. | आनंद नगर अमरावती | २९/०५/२०२३ चे २२-०० वा.<br><br>दाखल दि. २९/०५/२०२३ चे २३-२८ वा. | सर.तर्फ पो. उप नि. नानाजी चौधरी पो. स्टे. खोलापुरीगेट अमरावती | निलेश दौलतराव सावरकर वय २९ वर्ष रा. आनंद नगर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी श्रीमती लाली सुरेश जावे वय ६१ वर्ष रा. आनंद नगर अमरावती यांनी फोन व्दारे पो. स्टे. ला माहीती दीली की, त्यांचे घराचे शेजारी राहणारा निलेश दौलतराव सावरकर हा शिवीगाळ करुन मारण्याची धमकी देत आहे. अशा माहीती वरुन पो. स्टे. बीट मार्शल पो. कॉ. १८५१, १४९१ यांना घटनास्थळी पाठविले असता त्यांनी फोन व्दारे माहीती दीली की, अर्जदार यांचे घरासमोर निलेश सावरकर हा शिवीगाळ व धमक्या देत आहे अशा माहीती वरुन फिर्यादी पो. स्टाफ सह गेले असता यातील नमुद आरोपी हा मा. पोलीस उपायुक्त परी २ यांचे आदेश क्र. पो. उप आ/परी-२/तडीपार/६८१/२०२२ दि. ०९/०५/२०२२ अन्वये अमरावती शहर व ग्रामीण जिल्हा हद्दीतुन दोन वर्षा करीता तडीपार असतांना त्याने कोणतीही लेखी अथवा तोंडी पुर्व सुचना न देता अमरावती शहरात प्रवेश करुन मा. पोली. उपायुक्त परी २ अमरावती सहर यांचे तडीपार आदेशाचे उलंघन केल्याने त्यास पंचा समक्ष ताब्यात घेवुन त्याचेवर कलम १४२ म. पो. का. प्रमाणे गुन्हा दाखल |

- **प्रोव्हीशन रेड :-**

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | बडनेरा | अप.नं. ३९२/२३ कलम ६५(ई) महा दा. का. | हॉटेल रणजीत ढाबा, जुना बायपास रोड, अमरावती. | दि. २९.०५.२३ चे २१.४५ वा. | दि. २९.०५.२३ चे २३.२७ वा. | सरतर्फे नापोका शशिकांत शेळके ब.न.१३६० पो,स्टे बडनेरा अम | प्रविण मारोतराव पोकळे, वय ४० वर्षे, रा. बारीपुरा, जुनी वस्ती, बडनेरा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना १) दोन नग सिग्नेचर बाँटल्स प्रत्येकी १८०ml च्या कि. अं. ६४०/- रू. २) ०८ नग देशी दारूबाँबी संत्रा च्या प्रत्येकी १८० ml पावट्या, कि.अं. ५४०/- रू असा एकुण १२००/- रू. चा मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल |